जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २८ जुलै, २०२२

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र प्रशाळेद्वारे दि.३० जुलै, २०२२ रोजी एक दिवसीय मोफत एम.एड सीईटी मार्गदर्शन वेबिनारचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे.

एम.एड शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची शासनाद्वारे घेण्यात येणारी सीईटी परीक्षा दि.२ ऑगस्ट, २०२२ रोजी महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने एम.एड शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या परीक्षेत यश संपादन करता यावे, म्हणून या वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेबिनारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक तत्वज्ञान, मानसशास्त्र, संशोधन, प्रशासन व मूल्यमापन या सारख्या विषयांच्या पूर्व ज्ञानासंदर्भातील उजळणी करुन शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन बदलांसंदर्भातील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वेबिनार पूर्णत: मोफत व विनामूल्य असून यात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/jswaqDpNQQ9jaYxf8 या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. या वेबिनारला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून वेबिनारचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ.मनिषा इंदाणी यांच्याकडून करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी